**इमारत व इतर बांधकाम कामगार(रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम ५ अन्वये नेमण्यात आलेल्या तज्ञ समितीच्या दिनांक ११.०३.२०१३ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या अंतर्गत गठीत केलेल्या तज्ञ समितीची बैठक दिनांक ११.०३.२०१३ रोजी दुपारी २.०० वाजता मा.मंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सदर बैठकीस समितीचे उपाध्यक्ष तथा मा.राज्यमंत्री (कामगार) हे ही उपस्थित होते. तसेच याबैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| अ.क्र. | बैठकीस उपस्थित मान्यवर | पद |
|---|---|---|
| १ | श्री.मधुकर गायकवाड, कामगार आयुक्त, मुंबई | सदस्य |
| २ | श्रीमती पु. सु. तावडे, सह सचिव, विधी व न्याय विभाग | सदस्य |
| ३ | श्री. प्र. र. ममदापुरे, सह सचिव व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ४ | डॉ. मंगेश जी. कोरगांवकर, महासंचालक, नॅशनल इन्स्टीटयूट ऑफ कन्स्ट्रक्शन मॅनेजमेन्ट ॲन्ड रिसर्च, वालचंद टेरेस, मुंबई | सदस्य |
| ५ | श्री. अनिल दत्तात्रय ढवळे | सदस्य |
| ६ | श्री. दादाराव डोंगरे | सदस्य |
| ७ | श्री. आसिफ उमर कासकर | सदस्य |
| ८ | श्री. मुस्ताक अब्दुला दळवी | सदस्य |
| ९ | श्री. भरमा लगमण्णा कांबळे | सदस्य |
| १० | श्री. सुनिल गजानन उर्फ आबा चित्रे | सदस्य |
| ११ | श्री. विवेक अब्दुल | सदस्य |
| १२ | श्री. आर. व्ही. कुलकर्णी, कामगार उप आयुक्त, मुंबई | सदस्य - सचिव |

बैठकीच्या सुरुवातीस मा.मंत्री (कामगार) यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीस सुरुवात केली.

१. कामगार आयुक्त यांनी बैठकीचे प्रयोजन सांगून इमारत व इतर बांधकाम कामगार अधिनियमांतर्गत नियम तयार करणे, नियमात बदल करणे याबाबतीत शासनास शिफारस करण्यासाठी सदर तज्ञ समिती नेमली असल्याचे स्पष्ट केले. सदर अधिनियमाखाली राज्याने सन २००७ मध्ये नियम तयार केले असून दि. १ मे. २०११ रोजी त्रिपक्षीय इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ पुर्नगठीत केले असून तसेच पुर्नगठीत मंडळाकडे आतापर्यंत **रु. १०८९.००** कोटी रक्कम उपकरापोटी जमा झालेली आहे. तसेच आतापर्यंत १,०२,९९४ इतक्या कामगारांची मंडळात नोंदणी झालेली असून कामगारांची नोंदणी, योजनांची प्रसिध्दी व कल्याणकारी योजना यासाठी आतापर्यंत रुपये ३५.०० लाख इतका खर्च करण्यात आला आहे, व सुमारे १८,२२३ इतक्या कामगारांना जनश्री विमा योजना व इतर कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात आला आहे.

..२.

सदर मंडळाच्या आतापर्यंत १६ बैठका झाल्या असून त्यामध्ये बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी अधिनियमाच्या कलम २२ अंतर्गत **२३** योजनांचा ठराव मंजूर केला आहे. या ठरावाच्या आधारे त्यापैकी काही योजनांबाबत मसूदा, नियम व त्या ख.नचे नमूना अर्ज तयार करुन शासनास सादर केलेले आहेत. सदर नियमाची व त्याखालील नमुना अर्जाची प्रत या बैठकीच्या विषयसूची सोबत जोडली आहे असेही सांगितले. **या नियमांना सुध्दा मान्यता देण्याचे मान्य करण्यांत आले.**

२. राज्य शासनाने बांधकाम अधिनियमातर्गत सन २००७ मध्ये तर.. केलेल्या नियमात नवीन नियमाची भर घालणे, नियमात फेरबदल करणे तसेच लाभार्थींना कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यासाठी नियम तयार करणे आवश्यक असून यासाठी तज्ञ समिती नेमण्यात आलेली आहे, तरी सर्व सदस्यांनी याबाबत सूचना व शिफारशी कराव्यात, अशी विनंती कामगार आयुक्तांनी केली. मंडळाने इयत्ता १० वी व १२ वी मध्ये ७५ टक्के गुण मिळविणा-या लाभार्थीच्या पाल्यांना जो फायदा द्यावयाचा आहे, त्याबाबत सर्व सदस्यांत चर्चा झाली. श्री.डोंगरे यांनी ७५ टक्केची अट शिथील करण्याची सूचना केली. त्यावर कामगार आयुक्तांनी गुणांची अट ६० टक्के ठेवावी असे सूचविले. मा.राज्यमंत्री (कामगार) यांनी ही अट ५० टक्के एवढी ठेवावी अशी सूचना केली असता त्यास सर्व सदस्यांनी संमती दिली. कामगार आयुक्त यांनी भारतीय जीवन विमा महामंडळाची स्वावलंबन योजना लाभार्थी बांधकाम कामगारांना लागू करण्याचा प्रस्ताव मांडला, त्यास सर्व सदस्यांनी संमती दिली. कामगार आयुक्त यांनी या योजनेतर्गत बांधकाम कामगारांनी किमान ५ वर्ष सलगपणे रु.१२००/- एवढा हप्ता भरणे आवश्यक असल्याचे सांगितले व सदर हप्ता मंडळ भरु शकेल जेणेकरुन याचा फायदा अनेक कामगारांना होवू शकेल असेही सूचविले. **यावर श्री. डोंगरे, सदस्य यांनी असे सुचविले की, असंघटीत बांधकाम कामगारांचे सामाजिक सुरक्षेचा विषय लक्षात घेता, कामाचे स्वरुप लक्षात घेता लाभार्थ्यांस त्यांचा व त्यांचे कुटूंबाचा विम्याचा विशेष प्लॅन तयार करुन विमा उतरविण्यास विशेष तरतुद करणे आवश्यक आहे व तसा ठराव सुध्दा कल्याण मंडळाने घेतला आहे. यावर चर्चा होवून संमती** देण्यात आली.

३. कामगार आयुक्त यांनी असे नमूद केले की. नियोक्ता किंवा मालक कामगारांना ९० दिवस काम केल्याचा दाखला देण्यास घाबरतात त्यामुळे नोंदणी होत नाही. याकरिता असे प्रमाणपत्र नोंदणीकृत कामगार संघटनाने देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केल्याचेही प्रतिपादन

केले. त्यांनी असेही स्पष्ट केले की, काही राज्यांनी तसे नियम करुन कामगार संघटनांना प्रमाणपत्र देण्याची मुभा दिलेली आहे. तरी या बाबीचा विचार करुन तसे नियम करण्याबाबतचा विचार व्हावा असे सुचविले. यावर श्री.डोंगरे यांनी सांगितले की मालक नोंदणी प्रमाणपत्र देत नाही त्यावेळी नोंदणीकृत कामगार संघटनेची मदत घेवून कामगारांना संघटनेतर्फे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. याबाबत मंडळाचा ठराव झालेला आहे. तसेच दिल्लीच्या बांधकाम मंडळाने तशी तरतूद त्यांच्या नियमात केलेली असून इतर राज्यांनी त्याचे अनुकरण करण्याचे मा.सर्वोच्च न्यायालयाने एका निकालात आदेश दिलेले आहेत. त्याप्रमाणे तरतूद करावी असे मत व्यक्त केले. श्री. चित्रे यांनी बांधकाम मालक संघटनांना याबाबतीत पुरेशी कल्पना नाही त्यासाठी प्रबोधन होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले. श्री. दळवी यांनी जे कंत्राटदार शासकीय खात्यात नोंदणीकृत आहेत त्यांना नोकरीचे प्रमाणपत्र देण्याबाबत संबधीत विभागाने काम देण्याच्या वेळी (कामाची वर्क ऑर्डर देतेवेळी) स्पष्ट करावे अशी सूचना केली. श्री. कोरगांवकर यांनी नोंदणीचे अधिकार क्रेडाई या बांधकाम व्यावसायिक संघटना यांना देण्यात यावे असे सुचविले. कामगार आयुक्त यांनी याबाबत शिबीरे घेवून व प्रसिध्दी देवून बांधकाम व्यायसायिकांच्या निदर्शनास आणून देता येईल असे मत व्यक्त केले व त्याप्रमाणे कार्यवाही सुरु असल्याचेही सांगितले. मा.राज्यमंत्री (कामगार) यांनी प्रमाणपत्रामध्ये संघटनाकडून गैरफायदा होण्याची शक्यता नाकारता येत नाही असे मत व्यक्त केले या प्रसंगी श्री. डोंगरे यांनी सांगितले की, सर्व संघटना काही वाईट नसतात त्यामध्ये काही अपवाद असू शकेल. याबाबतीत विधी व न्याय विभागाचे काय मत आहे असे विचारले असता उप सचिव (विधी व न्याय विभाग) यांनी याबाबत विभागाने यापुर्वीच शंका उपस्थित केल्याचे निदर्शनास आणले. श्री.डोंगरे यांनी अशी सूचना केली की. ज्या संघटना या क्षेत्रात कमीत कमी ३ वर्ष कार्यरत आहेत त्यांना असे अधिकार देण्यात यावेत त्याचप्रमाणे कामगार संघटनांची नोंदणी कामगार आयुक्त कार्यालयात होत असते व निबंधक कामगार संघटना यांचे कामगार संघटनावर नियंत्रण असते. त्यामुळे ज्या कामगार संघटना गैरफायदा घेतील **त्यांचेवर कायदेशीर कारवाई करता येवू शकेल.** त्यावर मा.मंत्री (कामगार) यांनी संघटनांना नोंदणीसाठी काम केल्याचे प्रमाणपत्र देण्याबाबत **मा.सर्वोच्च न्यायालयाने २००९ मध्ये दिलेला निर्णय, दिल्ली बांधकाम मंडळ व इतर राज्याच्या बांधकाम मंडळाने केलेल्या तरतूदी प्रमाणे दुरुस्तीचा प्रस्ताव विधी व न्याय विभागास सादर करावा** असे सुचविले.

४. बांधकाम कामगारांची कौशल्यवृध्दी झाल्याशिवाय नवीन बांधकाम तंत्रासाठी कुशल कामगार मिळणार नसल्याने व बांधकाम क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान व कुशल कामगारांची वाढती गरज लक्षात घेता मंडळातर्फे बांधकाम कामगारांसाठी कौशल्यवृध्दीसाठी कार्यक्रम देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन कामगार आयुक्त यांनी केले. त्यासाठी त्यांनी शासनाच्या व्यवसाय व तंत्र शिक्षण विभागाशी संपर्क साधुन कार्यवाही चालु असल्याचे नमुद करुन या संदर्भात कौशल्यवृध्दी योजना तयार करुन त्याबाबतचे नियम करणेही आवश्यक असल्याचे सांगितले. तसेच काही राज्यात कौशल्यवृध्दी कार्यक्रम स्वतंत्र संस्था मार्फत चालविल्या जात असल्याचे सांगितले. श्री.ढवळे यांनी अशी संस्था राज्यात स्थापन होणे गरजेचे आहे असे नमुद केले. मा.मंत्री (कामगार) यांनी कौशल्यवृध्दीसाठी नियम करणेबाबत सूचन्रा केल्या तसेच कौशल्यवृध्दीच्या अभ्यासक्रमासाठी स्वतंत्र **ॲकॅडमी स्थापन करण्याचा निर्णय घेण्यांत आला. तसेच निवासी वस्तीगृह, शाळा, व्यवसाय प्रशिक्षण संस्था पाळणाघर इत्यादी योजनेचे नियम करण्यास मान्यता देण्यात आली.**

५. श्री.डोंगरे यांनी अधिनियमाच्या नियम ५६ खाली अधिकार प्रदान करावेत व विविध विषय निकाली काढण्यासाठी कामाचे वाटप करण्यास मंडळातर्गत वित्तीय समिती, योजना व अंमलबजावणी समिती, सरळ सेवा भरती समिती, टेंडर उपसमिती अशा विविध विषय निहाय उपसमित्या तयार करण्यात याव्यात असे नमुद केल. **याबाबतीत तपासून कोणत्या समित्या असाव्यात त्यामध्ये सदस्य किती असावेत याबद्दलचा प्रस्ताव पुढील बैठकीत ठेवावा असे सुचविले.**

६. श्री.डोंगरे यांनी नोकर भरतीचे नियम करणेबाबत सूचविले असता मा.कामगार आयुक्त यांनी अधिनियमातील तरतूदीनुसार प्रशासकीय खर्चास मर्यादा असल्याने कामगार आयुक्त कार्यालयातून निवृत्त झालेल्या अधिकारी व कर्मचा-यांच्या कंत्राटी पध्दतीने नेमण्याबाबत विचार व्हावा असे सांगितले, जेणेकरुन अनुभवी निवृत्त अधिकारी व कर्मचारी मंडळास उपलब्ध होतील व खर्चाच्या मर्यादेत सुध्दा चांगले काम होवू शकेल. श्री. ढवळे यांनी निवृत्त अधिकारी व कर्मचा-यांना मंडळाने नेमण्याबाबत मा.उच्च न्यायालयाने बंदी घातली आहे का? याबाबत तपासणी करुन निर्णय घ्यावा असे सूचविले. काही सदस्यांनी याबाबतीत निवृत्त कर्मचाऱ्यांना कामाचे बाबतीत जबाबदार धरता येईल का ? हे तपासण्याची सूचना केली. मा.राज्यमंत्री (कामगार) यांनी निवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना कंत्राटी पध्दतीने नेमल्यास हरकत नाही असे सांगीतले. मंत्री (कामगार) यांनी कामगार आयुक्त कार्यालयातील निवृत्त अधिकारी व कर्मचारी

यांना एक वर्षासाठी कंत्राटी पध्दतीने नेमावे व त्यानंतर त्यांच्या कामाचा आढावा घेवून गरजेप्रमाणे त्यांना पुढे कामावर ठेवण्याबाबतचा निर्णय घ्यावा **तसेच आवश्यक वाटतील तेवढे कर्मचारी नियुक्तीची कार्यवाही त्यांच्या स्तरावर करावी** असे सांगीतले.

७. बांधकाम कामगारांच्या रोजीसाठी व आरोग्यासाठी कंबल, मच्छरदाणी, चटया, सायकल इत्यादी उपयुक्त वस्तुंचे वाटप करण्याची सूचना काही सदस्यांनी केली असता त्यावर मा.मंत्री (कामगार) यांनी अशा वस्तू कामगारांपर्यंत कशा पोचवावयाच्या व त्यासाठी यंत्रणा असणे आवश्यक असल्याचे नमुद केले. श्री. चित्रे यांनी याबाबतीत शिबीरे घेवून वाटप करता येईल असे मत व्यक्त केले. कामगार आयुक्त यांनी स्थानिक रोजगार हमीतील कामगार वाटपासाठी सापडतील परंतु बरेच कामगार स्थलांतरीत असल्याने ते सापडणे अवघड आहे असे मत व्यक्त केले. काही सदस्यांनी कामगारांची बायोमॅट्रीक नोंदणी करुन वस्तु वाटप करता येतील असे सूचविले व वस्तु वाटपाचे ज्यांना कंत्राट मिळेल त्यांचेवरही जबाबदारी टाकावी व वस्तु मिळाल्याचे प्रमाणपत्र जिल्हयाच्या सहाय्यक कामगार आयुक्तांनी द्यावे असे सूचविले. कामगार आयुक्त यांनी वस्तु वाटपाची जबाबदारी कंत्राटदाराला न देता विभागामार्फत वस्तुंचे वाटप केले पाहिजे असे सांगितले. त्यावर मा.मंत्री (कामगार) यांनी **याबाबत योग्य ते नियम करण्यात यावेत असे** सांगितले.

८. नोंदणीत येणाऱ्या अडचणी लक्षात घेवून मालकास नोंदणीकृत कामगार घेण्याचे बंधन घालावे असे श्री. डोंगरे यांनी सूचविले, त्यावर श्री. ढवळे यांनी असे बंधन घातल्यास मालकाला काम करणे अतिशय अडचणीचे होईल त्यामुळे ही बाब करु नये असे नमुद केले . त्यावर कामगार आयुक्त यांनी अधिनियमामध्ये असे बंधन मालकांवर घालण्याची तरतूद नसल्याचे स्पष्ट केले. **त्यावर मा.मंत्री, कामगार यांनी सदर बाब कायदेशीर तपासून पुढील बैठकीत निर्णयास ठेवण्याचे ठरले.**

९. घर बांधणीसाठी मंडळाने प्रस्तावित केलेली रक्कम पुरेशी नसल्याचे व त्यामध्ये वाढ करण्याबाबतचा मुद्दा काही सदस्यांनी उपस्थित केला असता मा. मंत्री (कामगार) यांनी खालील प्रमाणे घर बांधणीसाठी कर्ज देण्याची सूचना केली

अ) महानगरपालिका क्षेत्रात रु. ५.०० लाख

ब) अ व ब वर्ग नगरपालिका क्षेत्रासाठी रु. ४.०० लाख

क) क वर्ग नगरपालिका क्षेत्रात रु. ३.०० लाख

ख) इतर क्षेत्रासाठी रु. २.०० लाख

तसेच घर दुरुस्तीसाठी घर बांधणी किंमतीच्या जास्तीत जास्त ५० टक्के पर्यंत कर्ज देण्याचे नियम करण्यास मान्यता देण्यात आली.

१०. या अधिनियमातील तरतूदी अमलबजावणी तपासणीसाठी एक टास्क फोर्स गठीत करण्यासंबंधी नियम करण्याची सुचना श्री.डोंगरे यांनी केली त्यावर चर्चा होवून नियम करण्याचे ठरले.

११. कामगार आयुक्त यांनी उपकर गोळा करण्याच्या कामाचे पर्यवेक्षण करण्यासाठी व अधिनियमाची अंमलबजावणीसाठी शासनास अभियंता यांची तांत्रिक पदे निर्माण करावी लागतील असे सांगीतले. मा.मंत्री (कामगार) यांनी पदे निर्मिती करण्यास बराच कालावधी लागेल कारण सदर पदास शासनाच्या उच्चस्तरीय समितीची मान्यता घेणे आवश्यक असल्याचे नमुद केले. मा. मंत्री (कामगार) यांनी बांधकाम विभागातील अभियंत्यांना मंडळाचे काम देता येईल का ? अशी विचारणा केली असता बांधकाम विभागाचे सह सचिव व मुख्य अभियंता यांनी यासाठी सुध्दा पदे निर्माण करावी लागतील असे स्पष्ट केले मा. मंत्री (कामगार) यांनी सार्वजनिक बांधकाम व कामगार विभागाची एक बैठक घ्यावी अशी सूचना केली.

बांधकाम कामगारांच्या नोंदणीसाठी बायोमेट्रीक पध्दत लागू करावी जेणेकरुन कामगारांची नोंदणी, कल्याणकारी योजनांचा लाभ व कामगाराची आरोग्य तपासणी करता येईल अशी सूचना श्री. ढवळे यांनी केली. **त्यास मान्यता देवून नियम करण्याचे ठरले.** मा.राज्यमंत्री (कामगार) यांनी बांधकाम कामगारांमध्ये विटभट्टी कामगारांचा समावेश होत नसल्यामुळे अधिनियमात बदल करावा लागेल असे सूचविले. मा.मंत्री (कामगार) यांनी ही बाब केंद्र शासनाच्या संबधित असून त्याबाबत केंद्र शासनाच्या स्तरावर विचार सुरु असल्याचे सांगीतले. श्री. डोंगरे यांनी सर्व लाभाच्या योजना व त्यांच्या नियमावलीस तज्ञ समितीच्या बैठकीत मंजूरी देवून अधिसूचना काढण्यास शिफारस करावी असे सूचविले. यावर अधिनियम व नियमातील तरतूदीनुसार तसेच विधी व न्याय विभागाशी चर्चा करुन योग्य ती कार्यवाही करण्याबाबत मा.मंत्री (कामगार) यांनी सूचित केले.

यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

*******

कामगार आयुक्त
महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(रचना व कार्यपध्दती-शाखा)
कार्यासन - ०४
14 NOV 2013
16 NOV 2013
आवक क्रमांक 4954
कार्यासन क्रमांक 30

महाराष्ट्र शासन

क्र : इमारत-२०१३/प्र.क्र.२०४/काम-७अ
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ११ नोव्हेंबर, २०१३.

प्रति,

कामगार आयुक्त,
कामगार भवन, ई-ब्लॉक, प्लॉट नं.सी-२०,
वांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे, मुंबई. ४०० ०५१

**विषय : इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवा शर्ती) अधिनियम,१९९६ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या तज्ञ समितीच्या बैठकीच्या इतिवृत्ताबाबत .**
**संदर्भ:- आपले ईमेल पत्र क्र.काआ/इवइबांकों/कार्यासन ३०, दिनांक: निरंक**

**महोदय,**

मा. मंत्री (कामगार) यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दिनांक ०८/१०/२०१३ रोजी झालेल्या इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवा शर्ती) अधिनियम,१९९६ अंतर्गत गठीत करण्यात आलेल्या तज्ञ समितीच्या बैठकीच्या इतिवृत्ताला मा. मंत्री (कामगार) यांनी मान्यता दिली आहे. त्या इतिवृत्ताची प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी पाठवित आहे.

आपला विश्वासू,

सु. द. सहस्त्रबुध्दे
( सु.द.सहस्त्रबुध्दे )
कक्ष अधिकारी

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत,

मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय,मुंबई.

प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई.